GLOBAL EDITION
सामना
सर्वांसाठी सर्वकाही
मराठी माणसाचे स्वतःचे वृत्तपत्र.

Print Email Comment

# महाराष्ट्र आर्थिक परिषद शुक्रवारी

मुंबई, दि. ६ (प्रतिनिधी) – महाराष्ट्र औद्योगिक आणि आर्थिक विकास असोसिएशनच्या वतीने तिसऱ्या एकदिवसीय महाराष्ट्र आर्थिक परिषदेचे आयोजन करण्यात आले आहे. मुंबईतील सहारा स्टार हॉटेलमध्ये सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत आयोजित या परिषदेचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते होणार आहे. यावेळी केंद्रीय नागरी विकासमंत्री व्यंकय्या नायडू, केंद्रीय वाहतूक मंत्री नितीन गडकरी हेही उपस्थित राहणार आहेत.

या परिषदेत सहभागी होण्यासाठी असोसिएशनच्या अंधेरी येथील कार्यालयात प्रत्यक्ष किंवा २२६१५०९८०० आणि ६६६७४४४४ या दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन महाराष्ट्र औद्योगिक आणि आर्थिक विकास असोसिएशनचे महादेव माने यांनी केले आहे.